# विशेष जिल्हा समाज कल्याण कार्यालय,
# मुंबई उपनगर

प्रशासकीय इमारत ४ था मजला, आर.. सी. चेंबूरकर मार्ग,
चेंबूर (पू.), मुंबई - ४०० ०७१.

VC|42|12
17|05|09

R-1
20|5|09

---

जा.क्र. विजिसकअ/मुंउप/जगदिशचंद गोहिल/शिष्यवृत्ती/०८-०९/६९४ दि. १५/४/०९

प्रति,

मा. कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट मुंबई.

**विषय :** भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेची संगणक प्रणाली विकसित करण्याबाबत.

**संदर्भ :** मा. संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क. सकसं /शिक्षण / भासशि / सॉफटवेअर / ०८-०९ / का-४/१२३ दि. २/२/२००९.

R-1
17|5|09

**महोदय,**

**मुंबई विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागामार्फत भारत सरकार शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क व परीक्षा फी प्रदाने या योजनेचा लाभ देण्यांत येतो.**

**महाविद्यालयांची व विद्यार्थ्यांची वाढलेली संख्या लक्षात घेता या कामाचा व्याप सतत वाढत आहे व त्यामानाने कर्मचाऱ्यांची संख्या कमी पडत आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीचे हे काम सॉफटवेअरच्या आधारे करणे अतिशय गरजेचे झाले आहे.**

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ नियमितपणे देण्याच्या उद्देशाने मा. संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी या योजनेचे संपूर्ण संगणीकरण करण्याचा निर्णय घेतला असून हे काम कल्प इन्फोटेक, पूणे यांचेकडे सोपविलेले आहे.**

**हे सॉफटवेअर सन २००९-१० पासून अंमलात करणे अनिवार्य केले आहे. त्यादृष्टीने सर्व महाविद्यालयांना या सॉफटवेअरची माहिती देणेकरिता दि. २७ मे ते २९ मे २००९ या दरम्यान प्राचार्य / महाविद्यालय प्रमुखांची बैठक मुंबई विद्यापीठ , कलीना सांताकृझ मुंबई येथे बोलाविण्य ात यावी , अशी विनंती . बैठकीमध्ये सॉफटवेअरची सविस्तर माहिती प्राचार्यांना देण्यांत येईल. तेव्हा बैठकीची वेळ व ठिकाण दि. २७ मे २००९ पूर्वी या कार्यालयाला अवगत होणेस विनंती.**

आपला विश्वासू,

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
मुंबई उपनगर करिता

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

**१ . ~~उप~~-कुलसचिव, मुंबई विद्यापीठ कालीना, सांताकृझ, मुंबई.**

**२ . विशेष मागासवगीय कक्ष, मुंबई विद्यापीठ , फोर्ट मुंबई.**

स्वाक्षरी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
मुंबई उपनगर